Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2501I01S01V13P0007

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Jan'25
Issue–I(I), Volume–XIII

# ग्रामीण विकासामध्ये ग्रामसभेचे योगदान आणि ग्रामपंचायत सदस्यांची भुमिका : एक अध्ययन

प्रा. डॉ. सुनिल व्ही. कोडापे
कार्यकारी प्राचार्य,
बी.पी. नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ सोशल वर्क,
हनुमान नगर, नागपूर २४
मो. ९४२१७१०८२७
Mail id - kodapesunil@gmail.com

## प्रस्तावणा

देशाच्या विकासात समतोल आणि संतुलन साध्य करण्यासाठी लोकशाही विकेंद्रीकरण हा एक प्रभावी मार्ग आहे. विकेंद्रीकरण ही लोकशाहीच्या दृष्टीने एक अत्यावश्यक बाब आहे. स्थानिक स्वराज्य संस्था नागरिकांवर संस्कार करणाऱ्या पाठशाळा आहेत. भारतासारख्या खंडप्राय, लोकशाहीची प्रदीर्घ परंपरा पाठीशी नसलेल्या देशात तर विकेंद्रीकरणाची नितान्त आवश्यकता आहे. म्हणूनच विकेंद्रीकरण म्हणजे स्वराज्याचे टप्प्याटप्प्याने होणारे प्रकटीकरण आहे असे म्हटले जाते स्थानिक उपक्रमशीलतेला विकेंद्रीकरणाव्दारे चालना मिळते. देशाच्या ग्रामीण भागातील बेकारी, दारिद्रय, अज्ञान व विषमता नष्ट करून ग्रामीण समाज संपन्न बनविण्याचे काम स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रामपंचायत करत आहे.

महात्मा गांधीजींचे खेडयाकडे चला हे ७० वर्षापूर्वीचे विचार आज लोकांच्या मनात रूजू लागले आहेत. महात्मा गांधीजींनी भारतात खऱ्या लोकशाहीच्या स्थापनेची कल्पना केली होती. खरी लोकशाही तंत्रप्रणाली केंद्रीकृत पध्दतीव्दारे चालविली जाऊ शकत नाही. प्रत्येक गावच्या लोकांनी कारभार करावयाचा असेल, ग्राम स्वराज्यात गावातच संपूर्ण सत्ता विकेंद्रित स्वरूपात चालवायची असेल तर शासनात लोकांचा सहभाग असला पाहिजे. तेव्हाच ग्रामीण भागाचा विकास साध्य करता येऊ शकतो. भारतात नागरी प्रशासनापेक्षा ग्रामीण प्रशासन फार महत्वाचे आहे. कारण भारतात आजही शहरांच्या तुलनेत खेडयांची संख्या जास्त आहे. देशात एकूण लोकसंख्येपैकी ७२ टक्के लोक खेडयांत राहतात. खेडयात कारभार पाहण्याचे काम ग्रामपंचायतीवर सोपविल्यामुळे आर्थिक विकासात ग्रामपंचायतींना फार महत्व प्राप्त झाले आहे. अर्थात देशातील ७२ टक्के लोकसंख्येच्या विकासाची जबाबदारी ग्रामपंचायतीकडे आहे.

आपला भारत देश खेड्यांचा देश आहे. भारताचा विकास साधावयाचा असेल तर पर्यायाने खेडयांचा विकास करावा लागेल. हे सत्य ओळखूनच राष्ट्रपिता महात्मा गांधीजी म्हणत असत की, ''स्वतंत्र भारताचे राष्ट्रीय नियोजन मुख्यत: खेडे विकासाचा केंद्रबिंदू मानून व्हावे'', स्वावलंबन आणि स्वयंपूर्णता हे विकासाचे ध्येय असावे. खेडे गावातील लोकांच्या स्वयंप्रेरणेला व कर्तृत्वाला ज्यामुळे पूर्ण वाव मिळेल, अशी राष्ट्रीय नियोजनाची दिशा असावी. लोकांना योग्य प्रकारचे शिक्षण मिळावे, त्याव्दारे खेडयातील लोक आपल्या गावाचे आरोग्य, आपली उत्पादन पध्दती अर्थव्यवस्था, नैसर्गिक साधनसंपत्ती यांचे नियोजन करतील. आजच्या ज्ञान–विज्ञानाचा फायदा घेवून अर्थव्यवस्था सुधारतील, पंचायतीच्या माध्यमातून गावाचा कारभार न्याय नीतीच्या बळावर सांभाळून करतील, असे वळण त्यांना लावायला हवे.

भारतीय समाजाचा सर्वांगिण अभ्यास करावयाचा असेल तर भारतीय ग्रामीण समाजाचा अभ्यास करणे अपरिहार्य ठरते. भारतीय ग्रामीण समाज १८ व्या शतकापर्यंत स्वतंत्र, स्वायत्त व स्वयंपूर्ण असा होता. ग्रामपंचायत, जातीपंचायतीच्या माध्यमातून समाजावर नियंत्रण ठेवले जात होते. बलुतेदारी पध्दतीमुळे गावातील गरजा गावातच भागवल्या जात असत. पाश्चिमात्य देशांमध्ये १८ व्या शतकात घडून आलेली औद्योगिक क्रांती व ब्रिटिश शासन प्रणालीचा भारतीय समाजावर मोठा परिणाम झाला. ग्रामीण व्यवसाय हळूहळू बंद पडू लागले. परंपरागत ग्रामपंचायत, जातीपंचायत व कौटुंबिक जीवनाचे विघटन झाले आणि सामाजिक जीवनाच्या शिस्तीस एक वेगळे वळण लागले.

औद्योगिकरण, नागरीकरणाचा परिपार म्हणून स्थलांतर, कौटुंबिक विघटन या प्रक्रिया विकसित होऊ लागल्या. दळणवळण आणि शैक्षणिक प्रगती यांच्यामुळे व्यक्तिस्वांतज्यांच्या कल्पना महत्त्वाच्या ठरू लागल्या. स्वातंत्र्योत्तर काळात राज्यघटनेनुसार कायद्यापुढे सर्वांना समान स्थान दिले गेले असल्यामुळे जातीसंस्था, अस्पृश्यता, हे घटक कालबाहय ठरू लागले. उच्चशिक्षण ज्या समाजघटकाकडे आधीपासूनच विशेषाधिकार होते, संपत्ती होती त्यांचीच मक्तेदारी होती. या या पार्श्वभूमीवर सामाजिक, राजकिय, आर्थिक आणि राजकिय न्याय मिळवून देणे हे राज्यघटनेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याने व्यक्तीचा वा पर्यायाने समाजातील सर्व घटकांचा सर्वांगिण विकास हे शासनाचे ध्येय असल्याने ग्रामीण विकास वा ग्रामीण पुनर्रचना हा महत्वाचा कार्यक्रम ठरला आहे.

भारतातील ६५ टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या अजूनही खेडयांमध्ये वास्तव्य करते. देशाचा विकास हा खेडयांच्या विकासावरच अवलंबून असल्याने स्वातंत्र्योत्तर काळात पंचवार्षिक योजनांची यशस्विता ग्रामीण विकासावर अवलंबून असल्याचे स्पष्ट झाले व त्यामुळेच विविध योजना व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या योजना व कार्यक्रमांमध्ये खालील उद्दिष्टये ठेवण्यात आली होती.

१) समाजातून दारिद्रय व गरीबीचे उच्चाटन करून आर्थिक स्थिरता आणणे.
२) शेती व्यवसायात बदल घडवून आणणे.
३) समाजामध्ये समुदाय भावना वाढीस लावणे.
४) समाजात आरोग्यविषयक जागृती करून आरोग्यमान सुधारणे.
५) समाजातील असलेली अंधश्रध्दा, अस्पृश्यता व जातीभेद नष्ट करणे.

दारिद्रय निर्मूलन व एका आरोग्यपूर्ण, उत्पादनक्षम समाजाचा पाया मजबूत करण्यासाठी पाणी, स्वच्छता व आरोग्य शिक्षणाला पर्याय नाही. स्वच्छतेचे महत्व लक्षात घेता, इ.स. १९९९ पासून यासंदर्भाने स्वतंत्र 'संपूर्ण स्वच्छता मोहिम' ही अभिनव योजना राबविली जाऊ लागली. या उपक्रमात लोकसहभागाला महत्व दिले गेले. ग्रामीण भागात रोजगाराच्या उपलब्धतेसाठी सन २००४ मध्ये 'राष्ट्रीय रोजगार हमी योजना' ही योजना सुरू करण्यात आली. ग्रामीण भारताचे पुन:निर्माण करण्यासाठी २००५–०६ पासून 'भारत निर्माण' योजना राबविण्यात येत आहे. तंटे बखेडे व वैयक्तिक शत्रुत्व हे ग्रामविकासात अडसर निर्माण करणारे घटक असल्याने १५ ऑगस्ट २००७ रोजी महाराष्ट्र शासनाने 'महात्मा गांधी तंटा मुक्त गाव मोहिम' ही योजना सुरू केली. गावामध्ये तंटे होऊ नये याशिवाय तंटे झाल्यास त्याचा ग्रामपातळीवरच सामोपचाराने निप्टारा व्हावा हा या योजनेचा मुख्य हेतू आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्थेत ग्रामपंचायतीचे महत्व :–**

भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर लोकशाही प्रणालीचा स्वीकार केला. लोकशाहीमध्ये सत्ता विकेंद्रीकरणाला फार महत्व आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणामार्फतच सरकारला ग्रामीण भागातील जनतेचे प्रश्न सोडविता येतात. लोककल्याणाची कामे दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे ही कामे सर्वतोपरी सोडविण्यासाठी केंद्र सरकारने काही प्रमाणात जबाबदारी राज्य सरकारवर सोपविली आहे. राज्य सरकारने ग्रामीण भागातील लोककल्याणाच्या कामांची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेवर सोपविली आहे. प्रत्येक गावाचे प्रश्न वेगवेगळे आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रामपंचायती गावाचे प्रश्न सोडवून ग्रामीण भागाचा आर्थिक विकास साध्य करू शकतात.

**ग्रामपंचायतीचे कामे :—**

१) गावातील रस्ते बांधणे.
२) गावातील रस्त्यांची दुरूस्ती करणे.
३) दिवाबत्तीची सोय करणे.
४) जन्म, मृत्यू व विवाह यांची नोंद ठेवणे.
५) सार्वजनिक स्वच्छता ठेवणे.
६) सांडपाण्याची व्यवस्था करणे.
७) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे.
८) शिक्षण तसेच आरोग्य विषयक सोयी पुरविणे.
९) शेती विकासाच्या व पशुधन सुधारणेच्या योजना अंमलात आणणे.
१०) आठवडी बाजार, जत्रा, उत्सव यांची व्यवस्था ठेवणे.

**ग्रामसभेचे सदस्य :—**

पूर्वी राजे राज्य करीत. आता लोक राज्यकारभार पाहतात. ज्या कारभारात सर्व लोक सहभागी होतात आणि राज्यकारभाराचे निर्णय घेतात त्या पध्दतीला प्रत्यक्ष सरकार अथवा प्रत्यक्ष (स्थानिक पातळीवरची) लोकशाही असे म्हणतात. ज्या कारभारात लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी सहभागी होतात आणि राज्यकारभाराचे निर्णय घेतात त्या कारभार पध्दतीला अप्रत्यक्ष सरकार किंवा प्रतिनिधीचे सरकार असे म्हणतात.

आपली ग्रामपंचायत ही अप्रत्यक्ष कारभाराचे उदाहरण आहे तर ग्रामसभा ही प्रत्यक्ष कारभाराचे उदाहरण आहे आणि ग्रामपंचायतीच्या मतदारांची संस्था आहे. ग्रामपंचायतीच्या हद्दीत असणाऱ्या गावातील व वाड्यावस्त्यामधील ग्रामपंचायतीचे मतदान हे ग्रामसभेचे सदस्य आहेत.

**ग्रामसभेचा कारभार :—**

ग्रामसभेच्या सदस्यांनी एकत्र यावे. लोकांच्या गरजा काय आहेत त्या ग्रामपंचायतीला सांगाव्यात आणि गावांच्या भल्यासाठी कोणत्या योजना अगोदर घ्याव्यात हे सुचवावे ग्रामपंचायतीला सल्ला दयावा आणि मार्गदर्शन करावे. थोडक्यात सांगावयाचे तर ग्रामसभेच्या गावांच्या विकासात सहभागी व्हावे. याशिवाय ग्रामसभेने, ग्रामपंचायतीने वर्षभरात गावांच्या विकासाची जी कामे केली असतील त्यांची माहिती व आढावा घ्यावा. ग्रामपंचायतीने पुढील वर्षी विकासाची जी कामे करावयाची ठरविले असेल त्यांची माहिती घ्यावी. ग्रामपंचायतीने वर्षभर केलेल्या खर्चाचा हिशोब घ्यावा आणि पुढील वर्षी किती खर्च केला जाणार आहे त्याची माहिती घ्यावी. ग्रामपंचायीतीने हिशोब तपासताना हिशोब तपासणाऱ्या अधिकाऱ्याला ज्या शंका आल्या असतील त्या शंका जाणून घ्याव्यात आणि त्या शंकांना ग्रामपंचायतीने जी उत्तरे दिली असतील ती उत्तरे समजून घ्यावीत. ग्रामपंचायत करीत असलेल्या

कारभाराची प्रश्न विचारून माहिती घ्यावी आणि ग्रामपंचायतीला सूचना कराव्यात. म्हणजेच ग्रामपंचायतीच्या कारभारावर ग्रामसभेने नियंत्रण ठेवावे आणि ग्रामपंचातीवर निवडून दिलेल्या सदस्यांनी चांगली कामे केली तर प्रोत्साहन दयावे व त्यांच्याकडून कामे नीट नसतील तर त्यांना जाब विचारावा अशी अपेक्षा आहे.

**ग्रामसभेचे पदाधिकारी :—**

ग्रामसभेला पदाधिकारी नाहीत. ग्रामसभेला एक अध्यय आहे. निवडणूक झाल्यानंतर पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष व आर्थिक वर्षातील पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष हा सरपंच असतो. त्याच्या अनुपस्थितीमध्ये उपसरपंच अध्यक्ष असतो. इतर ग्रामसभासाठी ग्रामसभेस उपस्थित असलेल्या सभासदापैकी एकाची बहूमताने अध्यक्ष म्हणून निवड करावी लागते.

अध्यक्षस्थानी असलेल्या व्यक्तीने ग्रामसभेची संपूर्ण बैठक पार पाडेपर्यंत बैठकीचे नियमन करावे लागते. सुरूवातीस विषय पत्रिकेतील यादी सर्वांना वाचून दाखवावी लागते. विषयास सुसंगत असा प्रश्न विचारण्याचा अधिकार ग्रामसभा सदस्यांना आहे. अशा सर्व प्रश्नांची उत्तरे अध्ययक्षाने तोंडी दयावी लागतात. विषयाचे स्वरूप लक्षात घेऊन एखादया सभासदास चर्चा करण्यास किती वेळ दयावयाचा हे ठरविण्याचा अधिकार अध्यक्षांना आहे. विषय पत्रिकेत नमुद केलेल्या विषयाशिवाय इतर विषयावर अध्यक्षाच्या परवानगी शिवाय चर्चा करता येत नाही.

**ग्रामसभेचे अधिकार :—**

१) गावामध्ये काम करीत असलेल्या शासकीय — निमशासकिय व पंचायतीच्या कर्मचाऱ्यांवर तसेच त्यांच्या कार्यालयातील रोजच्या उपस्थितीवर ग्रामसभेचे शिस्त विषयक नियंत्रण असेल. अशा कर्मचाऱ्यांचे आर्षिक मुल्यमापन ग्रामसभेकडून त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले जाईल.

२) ग्रामसभा ही अशा कोणत्याही कर्मचाऱ्यांकडून घडलेली नियमबाहय गोष्ट संबंधित गट विकास अधिकाऱ्याला अहवालामध्ये नमुद करून देईल. त्यावर ३ महिन्याचे आत गटविकास अधिकारी यांनी कार्यवाही केली पाहिजे. त्यांनी मुदतीत कार्यवाही न केल्यास अहवाल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी यांचेकडे हस्तांतरीत केला जाईल व त्यावर ते ३ महिन्याचे आत कार्यवाही करतात.

३) ग्रामसभा राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या व्यक्तिगत लाभधारक योजनेकरीता लाभधारकांची निवड करील.

४) ग्रामसभा सर्वसाधारणपणे पदाच्या सभेचा दिनांक, वेळ, ठिकाण, तिच्या अगोदरच्या सभेत निश्चित करतील.

५) ग्रामसभेस सुट दिली नसेल तर गावात काम करणारे शासकिय, नियमशासकिय आणि पंचायतीचे सर्व कर्मचारी ग्रामसभेच्या सभांना हजर राहतील.

६) पंचायतीकडून राबविण्यात येणाऱ्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या योजना, कार्यक्रम व प्रकल्प यांना, अशा योजना कार्यक्रम व प्रकल्प यांच्या अंमलबजावणीचे काम त्या पंचायतीने हाती घेण्यापूर्वी मान्यता देणे, (कलम ८ अ (१) व विकास योजनांवर कोणताही खर्च करण्याची पंचायतींना परवानगी देणे (कलम ८ अ (२) प्रमाणे) आणि कलम ४५ पोटकलम ६ ड नुसार पंचायत विअक्स योजनावर कोणताही खर्च करण्यासाठी ग्रामसभेची परवानगी मिळवतील.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2501I01S01V13P0007
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Jan'25
Issue–I(I), Volume–XIII

७) ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ८ मध्ये सुधारणा करून (८ अ) ग्रामसभेचे अधिकार व कर्तव्ये म्हणून घालण्यात आलेले आहे. ग्रामसभा गावची सर्वोच्च सभा म्हणून सबळ व्हावी या हेतूने ग्रामपंचायतीने ग्रामसभेची मान्यता घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. गावाचे अधिकार आजपर्यंत ग्रामपंचायती मार्फत राबविले जर होते ते आता ग्रामसभेच्या अधीन असतील.

८) कोणतीही भूमी संपादन करण्यापूर्वी ग्रामपंचायतीने आपले मत कळविण्याआधी ग्रामसभेचे मत घेणे आवश्यक आहे. त्यासंबंधी निर्णय घेण्यापूर्वी समपेक माहिती उदा. संपादनाचा हेतू, विस्तापित होण्याची शक्यता व विस्तापितांचे पुनवेसन इत्यादी माहिती प्राधिकरणकडून मिळविण्याचा ग्रामसभेचा अधिकार यात अभिप्रेत आहे. (कलम ८ अ (३) प्रमाणे)

९) ग्रामदक्षता समिती, ग्रामशिक्षण समिती, ग्रामीण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व लेखा परीक्षण समिती सारख्या महत्वाच्या समित्या ग्रामसभेने निवडावयाच्या आहेत.

१०) संपुर्ण ग्रामीण रोजगार, राष्ट्रीय रोजगार हमी योजनेखालील कामे तसेच ग्रामीण भागाशी संबंधित महत्वाचे कार्यक्रम घेतात व त्याची अंमलबजावणी करताना वेळोवेळी ग्रामसभेपुढे अशा कार्यक्रमांची माहिती दिली पाहिजे.

११) ग्रामसभा ही गावातील स्त्री—पुरूषांना विकास कामे व नियोजनाच्या कामात सहभागाच्या अधिकारासोबत ग्रामपंचायतीच्या कारभारावर व गावकारभाऱ्यांवर नियंत्रणाचा अधिकारही देते.

**बिज शब्द :— ग्राम, ग्रामपंचायत, गामसभा, विकास,योगदान आणि सदस्य, भुमिका**

**अध्ययनाचे उद्देश :—**

प्रस्तुत अध्ययनाचे खालील प्रमाणे उद्‌देश आहेत.

१) ग्रामस्थाची वैयक्तिक व कौटुंबिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
२) ग्रामस्थांची राजकीय पार्श्वभूमी जाणून घेणे.
३) ग्रामसभेचे स्वरूप व कार्य जाणुन घेणे.
४) ग्रामपंचायत सदस्यांच्या भुमिका विषयी ग्रामस्थांचे मत जाणून घेणे.
५) ग्रामसभेचा गावकऱ्यावरील प्रभाव जाणुन घेणे.
६) ग्रामसभेविषयी गावकऱ्यांचा प्रतिसाद जाणुन घेणे.

**उपकल्पना :—**

१) ग्रामसभेमध्ये गावकऱ्यांचा पाहिजे तसा सहभाग राहत नाही.
२) ग्रामसभेविषयी गावकऱ्यांमध्ये जागृती नाही.
३) ग्रामपंचायत सदस्यांच्या शैक्षणिक, बौध्दीक व मानसिकतेवर कार्यक्षमता अवलंबुन आहे.
४) निस्वार्थी सदस्य लोकांचे कार्य अधिक प्रभावी करून लोक नेता बनतो.
३) ग्रामसभेत महिलांचा सहभाग मोठया प्रमाणात असतो.

**अध्ययनाचे क्षेत्र व विश्व :—**

प्रस्तुत अध्ययनासाठी नागपूर जिल्हातील रामटेक तहसिल घेण्यात आली. आणि त्या तहसिल मधिल निवडक आदिवासील बहुल पाच गावे अध्ययनाचे क्षेत्र म्हणून निवड करण्यात आले. तर विश्वात रामटेक तालुक्यातील पाच गावातील १८ वर्षावरील सर्व नागरिक हे अध्ययनाचे विश्व आहे.

**संशोधन आराखडा :—**

प्रस्तुत अध्ययनाचा उदेश लक्षात घेवून संशोधन कार्याची दिशा ठरविण्यात आली. भारताला स्वातंत्र मिळुन ७५ वर्ष पुर्ण झाली. स्वातंत्र्याचा खरा अर्थ लोकांना कळला काय? तथा त्याचा लाभ लोकांना मिळाला काय? लोकांची मानसिकता आणि प्रवृतीत बदल झाला काय ? लोक आपल्या अधिकाराबाबत,कार्या प्रती जागृत आहेत हे बधायचे असल्याने वर्णनात्मक व निदानात संशोधन आराखडा निश्चित करण्यात आला. सर्व प्रथम माहीती कोणाकडुन कश्यापध्दतीन प्राप्त करायची याचा विचार करण्यात आला. तथ्याचे संकलन कोणत्या पध्दतीने व कसे करावे नमुना कोणता घ्यायचा यावर विचार करण्यात आला. गैर संभाव्य पध्दती मधिल सोयीसकर पध्दतीचा वापर कष्न प्रत्येक गावातुन २५ नागरिक असे पाच गावातुन १२५ नागरिकांना भेटुन मुलाखत अनुसूची,वैयक्तीक,समुह चर्चा करून आणि प्रत्यक्ष निरिक्षण करून तथ्थ संपादन करण्यात आले. आलेल्या माहीतीचे प्रक्रियन करतांना तथ्याचे वर्गीकरण,विश्लेषन करून निष्कर्ष काढण्यात आले.आणि आवश्यक सुचना व शिफारशी केल्या आहे.

**निष्कर्ष**

१) प्रस्तुत संशोधनात सर्वाधिक ७५ टक्के उत्तरदाते पुरूष आहेत.

२) प्रस्तुत संशोधनात सर्वाधिक ६७.५० टक्के उत्तरदाते ४० ते ५० वर्षे वयोगटातील आहेत.

३) प्रस्तुत संशोधनात सर्वाधिक ९७.५० टक्के उत्तरदाते अनु. जमातीचे आहेत.

४) प्रस्तुत संशोधनात सर्वाधिक ४० टक्के उत्तरदाते प्राथमिक पर्यंत शिक्षण घेतलेले आहेत.

५) प्रस्तुत संशोधनात सर्वाधिक ३५ टक्के उत्तरदाते शेती करणारे आहेत.

६) प्रस्तुत संशोधनात सर्वाधिक ६२.५ टक्के उत्तरदात्यांना शेतीसाठी कर्ज काढावे लागले.

७) प्रस्तुत संशोधनात सर्वाधिक ३५ टक्के उत्तरदाते कर्जाची परतफेड स्थावर मालमत्ता किंवा दागिणे विकून करीत आहेत.

८) प्रस्तुत अध्ययनात सर्वाधिक उत्तरदात्याचे शेती व मजुरी कामावर त्यांचे उत्पन्न अवलंबून आहे.

९) प्रस्तुत अध्ययनात १०० टक्के उत्तरदात्यांच्या गावात ग्रामपंचायत व्दारा ग्रामसभा घेतल्या जातात

१०) प्रस्तुत अध्ययनात सर्वाधिक उत्तरदाते ग्रामसभेची माहिती दवंडी देवून तसेच लाऊड स्पिकर मार्फत दिली जाते म्हणणारे आढळून आले.

११) प्रस्तुत अध्ययनात सर्वाधिक ८५ टक्के उत्तरदाते गावातील नागरिक ग्रामसभेला उपस्थित राहतात
असे मत व्यक्त करतात.

१२) प्रस्तुत अध्ययनात सर्वाधिक ८० टक्के उत्तरदाते ग्रामसभेला उपस्थित राहण्याचे कारण ग्रामसभेच्या चर्चेत भाग, प्रश्न विचारणे तसेच गावातील अडचणी लक्षात आणुन देणे हया बाबी सांगणारे आहेत.

१३) प्रस्तुत अध्ययनात ग्रामसभेला उपस्थित न राहणाऱ्या उत्तरदात्यापैकी ग्रामसभेला उपस्थित राहणाऱ्या उत्तरदात्याचे प्रमाण जास्त आहे.

१४) प्रस्तुत अध्ययनात सर्वाधिक ९० टक्के उत्तरदात्याच्या मते सवग नागरिक ग्रामसभेच्या कामकाजात सहभागी होत नाही. असे मत दर्शवितात

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2501I01S01V13P0007

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Jan'25
Issue–I(I), Volume–XIII

१५) प्रस्तुत अध्ययनात सर्वाधिक ९५ टक्के उत्तरदात्यांनुसार ग्रामसभेविषयी गावकऱ्यांमध्ये जागृकता दिसून येत नाही.

१६) प्रस्तुत अध्ययनात सर्वाधिक ९५ टक्के उत्तरदात्यांनुसार सर्वाधिक महीला ग्रामसभेला उपस्थित राहुन आपले प्रश्न मांडतात

१७) प्रस्तुत अध्ययनात सर्वाधिक ९० टक्के उत्तरदाते ग्रामसभेत गावकऱ्यांच्या सुचना अथवा विकासाच्या योजना कमी अधिक प्रमाणात मांडल्या जातात म्हणणारे आढळून आले.

१८) प्रस्तुत अध्ययनात सर्वाधिक ९० टक्के उत्तरदाते गावात रस्त्यांची समस्या, स्वच्छताविषयक समस्या, पाण्याची समस्या, शिक्षणाची समस्या सांगणारे आहेत.

१९) प्रस्तुत अध्ययनात सर्वाधिक ८० टक्के उत्तरदाते सदस्यांचे शिक्षण आणि मानसिकता या संबंध त्याच्या कार्यप्रणालीवर परिणाम करतात असे मानतात.

२०) प्रस्तुत अध्ययनात सर्वाधिक ९५ टक्के उत्तरदाते सदस्याचे निस्वार्थीपणा,लोक हीताबाबत असलेली जाणिव त्याच्या कार्याला प्रेरणा देत आहे.

२१) प्रस्तुत संशोधनात सर्वाधिक ७५ टक्के उत्तरदाते ग्रामपंचायतीच्या कामकाजापासून अंशत:समाधानी आहे.

२२) प्रस्तुत संशोधनात सर्वाधिक ८० टक्के उत्तरदाते ग्रामसभेमुळे सरपंच, सदस्य व अधिकारी यावर नियंत्रण साधारण प्रमाणात राहते म्हणणारे आहेत.

२३) प्रस्तुत संशोधनात सर्वाधिक ७० टक्के उत्तरदाते निवडलेल्या सदस्यांवर ग्रामसभेमुळे साधारण प्रमाणात नियंत्रण आले म्हणणारे आहेत.

२४) प्रस्तुत संशोधनात सर्वाधिक ८० टक्के उत्तरदाते ग्रामसभेमुळे विकासावर चांगला परिणाम होतो म्हणणारे आहेत.

**सुचना व शिफारशी**

१) ग्रामपंचायतीच्या आर्थिक हिशोबाचे ज्या प्रमाणे लेखापरीक्षण केले जाते. त्या प्रमाणे ग्रामसभा अभिलेखाचे दरवर्षी परीक्षण करण्यासाठीची तरतुद करण्यात यावी.

२) ग्रामपंचायत सदस्यांना ग्रामसभा बैठकितील उपस्थिती सक्तीची करण्यात यावी. प्रत्येक सदस्यांना एका विशिष्ट कार्याची जबाबदारी देवून त्यांच्या कार्याचा आढावा घ्यावा

३) प्रत्येक नियमित व विशेष ग्रामसभा बैठकांना निरीक्षकांची उपस्थिती अनिवार्य करण्यात यावी.

४) ग्रामसेवकांना सेवांतर्गत देण्यात येणारे प्रशिक्षण त्यांच्या प्रत्यक्ष कामकाजाशी संबंधित असावे. उदा.ग्रामपंचायतीचे रेकार्ड ठेवणे,ग्रामसभेचे इतिवृत्त लिहिणे, वार्षिक हिशोब पत्र तयार करणे इ.

५) ग्रामसभेतील महिलांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टिने महिला बचत गट, महिला मंडळ, महिला संघटना यांच्या माध्यमातून महिलांना ग्रामसभेबाबतची माहिती, महिलांच्या दृष्टिने तिचे महत्व व त्या अनुषंगाने त्यांच्या जबाबदाऱ्या यांची माहिती देऊन महिलांमध्ये ग्रामसभेविषयी जागृती करण्यासाठी सेवाभावी संस्थांची मदत घेण्यात यावी.

**संदर्भग्रंथ सुची :—**

१) डॉ. आगलावे प्रदिप, संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे नागपूर : विद्या प्रकाशन,
१ जानेवारी, प्रथमावृत्ती.

२) भराट राजेश (संपादित) चालु घडामोडी, पुणे : साई पब्लिकेशन, तीसवी आवृत्ती.

३) डॉ. खापर्डे सुदर्शन, ग्रामपंचायतीचे प्रशासन, नागपूर, विद्या प्रकाशन, २००८. प्रथमावृत्ती.

https://doi.org/10.69758/GIMRJ/2501I01S01V13P0007

४) प्रा. मेश्राम सुरेश, प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन, नागपूर : कृष्णचंद्र एजन्सिज, सप्टेंबर २०००, प्रथमावृत्ती.

५) डॉ. शर्मा श्रीनाथ आणि डॉ. सिंग मनोज (संपादित) पंचायत राज एवंम ग्रामिण विकास, बिना (मध्यप्रदेश) , आदित्य पब्लिशर्स, २०००

६) वृत्तपत्र :— दैनिक सकाळ, लोकमत, लोकसत्ता इ.

७) वेबसाईड :— www.google.com, www.shodhganga.com, www.lokmat.com